# निशाणी क्र. ६० वरील आदेश

वादीचे वारसांनी प्रस्तुतचा अर्ज वादी यांचे वारसांविरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करून प्रस्तूत वादीचे वारस अभिलेखावर घेणेसाठी दाखल केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूत कामी वादी बाळकृष्ण गंगाराम राणे हे दि. ०५/१२/२०२१ रोजी सौंदाळे, ता.देवगड येथे मयत झाले आहेत. त्यांचे कायदेशीर वारस आजरोजी दाखल करत आहेत. परंतू सदर वारस हे वेगवेगळया ठिकाणी राहणारे आहेत. तसेच दरम्यानचे काळात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव झालेला असल्याने वादीचे वारसांना मुदतीत न्यायालयात हजर होऊन वारस दाखल करणे शक्य झालेले नाही. सदरकामी वारस दाखल करण्यास मुद्दाम विलंब केलेला नसून तो केवळ प्राप्त परिस्थतीमुळे झालेला आहे. त्यामुळे, सदर कामी वादीविरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करून प्रस्तूत वादी याचे वारस दाखल करणेस परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, अर्जात दिलेले कारण योग्य व संयुक्तिक नाही. सबब, अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती प्रस्तूत प्रतिवादी यांनी केली आहे.

३. वादीचे वारस व प्रतिवादी यांच्यातर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तूत वादी बाळकृष्ण गंगाराम राणे हे दि. ०५/१२/२०२१ रोजी मयत झाले आहेत असे दिसून येते. प्रस्तूत वादी हे मयत झाले आहेत, याबाबत वाद दिसून येत नाही. सदरचा दावा हक्कठराव व निरंतर ताकिदीकरीता दाखल केला आहे. सदर दाव्यास प्रस्तूत वादीचे वारस हे आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे अबेटमेंटचा आदेश रद्द करणे न्यायोचित वाटते. परिणामी प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, खालील आदेश पारीत करीत आहे:

–**<u>आदेश –</u>**

१. प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : देवगड
दिनांक: ०९/०३/२०२२

( बी.आर.पाटील )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by BALKRISHNA RAJARAM PATIL
Date: 2022.03.10 15:39:59 +0530